# मृत्यूचे शिखर

**गुरुनाथ नाईक**

**रिया पब्लिकेशन्स्, कोल्हापूर**

B250

प्रमुख वितरक

**अजब डिस्ट्रिब्युटर्स**

६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.
ajabpublications@gmail.com

**मृत्यूचे शिखर : गुरुनाथ नाईक**

© **गुरुनाथ नाईक**

**प्रकाशक**
रिया पब्लिकेशन्स्
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.
riyapublications@gmail.com

**प्रमुख वितरक**
अजब डिस्ट्रिब्युटर्स
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.
ajabpublications@gmail.com

**अक्षरजुळणी**
रावजी देसाई

**मुखपृष्ठ**
चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर.

**मुद्रक**
जयंती प्रिंटरी

**आवृत्ती**
२९ ऑगस्ट, २०१३

**किंमत**
रुपये २००/-

## अनुक्रमणिका

मृत्यूचे शिखर / ५
द्वंद्व युद्ध / ७७
अदृश्य छाया / १३५

# मृत्यूचे शिखर

# १

तो अचानक श्रीनगरमध्ये पावसाळी छत्रीसारखा उगवलेला. बिहारीलाल एकदम प्रसिद्धीला यावा, हा केवळ योगायोग नव्हता. श्रीनगरमधील वर्तमानपत्रांनी एकदम त्याला प्रसिद्धीच्या शिखरावर नेऊन पोचवले होते.

आणि उद्योगधंद्याच्या भरमसाट जाहिराती त्याच्याकडून उकळायला सुरुवात केली होती.

हा बिहारीलाल स्वतः आपण मोरादाबादहून आलो, असे सांगत होता. भारतातील अनेक शहरांतून त्याचे उद्योगधंदे सुरू होते. अनेक कंपन्यांवर तो डायरेक्टर होता.

त्याचे व्यक्तिमत्त्व अतिशय आकर्षक होते. त्याची राहणी कमालीची महागडी होती. कित्येक लाख रुपये देऊन त्याने आलिशान असा बंगला खरेदी केला होता. पाच लाख रुपये उघडरीत्या दिले असले तरी चार-पाच लाख रुपये त्याने बेहिशेबी दिले असावेत, अशी चर्चा सुरू झाली होती.

पण ती त्याच्या खिसगणतीत नव्हती. कोणत्याही अफवेचा अगर चर्चेचा विचार करायला त्याला अजिबात वेळ नव्हता.

खास त्याच्यासाठी रोल्सराईस दारात चोवीस तास जय्यत तयारीत खडी असायची. त्याच्या नोकर माणसांसाठी चार निरनिराळ्या आलिशान गाड्या मौजूद होत्या.

आणि म्हणूनच हल्ली कुणीही किराणी दुकानाच्या उद्घाटनाची फित कापण्यापासून ते कॉलेजच्या पदवीदान समारंभापर्यंत त्याला आपोआप

अध्यक्षस्थान अगर उद्‌घाटकाचे स्थान मिळू लागले होते. सर्वच्या सर्व वर्तमानपत्रांतून त्याचे फोटो छापून येऊ लागले होते.

आपोआपच राजदरबारातही त्याला महत्त्व प्राप्त झाले होते. मंत्रिसंत्रीही त्याच्या मैत्रीत आणि मिंधेपणात हळूहळू अडकू लागले होते.

ती सकाळ या बिहारीलालच्या नजरेत अतिशय नाजूक होती. धुक्यामुळे सूर्यप्रकाश अडल्यासारखा झाला होता. असे हे वातावरण नेहमीचेच होते, पण आज का कोण जाणे, त्याला काहीतरी वेगळे वेगळे असे वाटू लागले होते.

आपल्या आलिशान कारमध्ये बसण्यासाठी निघालेला बिहारीलाल मागे फिरला. चकार शब्द न उच्चारता तो आपल्या खास खोलीत शिरला... त्यावेळी त्याचा चेहरा चिंतातूर बनला होता.

आत येता येताच त्याने दार आतून बंद केले.

त्या खास खोलीची रचना त्याला हवी तशी होती. आतून बोलण्याचे आवाज दाराला कान लावला तरी बाहेर जाणे शक्य नव्हते. विचारांच्या तंद्रीत असतानाच नक्षी कलाकुसर असलेल्या कपाटाच्या कोपऱ्याच्या एका कोरलेल्या मोराकडे त्याचे बोट सरकले. तो मोर अगदी हुबेहूब वाटत होता. बनवणाऱ्याने आपली कला पूर्णपणे त्या ठिकाणी ओतली होती.

चमकदार असा मोराचा डोळा बिहारीलालने बोटांनी दाबला. कट् असा आवाज आला... डोळ्यांत तांबड्या उजेडाची लुकलुक सुरू झाली. अस्पष्टशी घरघरही खोलीत घुमली आणि कट् असा आवाज करून सारे शांत झाले. लुकलुकणारा तांबडा उजेड बंद झाला.

बिहारीलालने कपाटाची मूठ ओढली आणि दार येण्याऐवजी कपाटच पुढे आले. अगदी दारासारखे. भिंतीत एक पोकळी निर्माण झाली. पलीकडे गडद अंधार होता.

बिहारीलालने डावा हात त्या पोकळीत घालून दिवा लावला आणि सरळ आत प्रवेश केला.

ती खोली राजेशाही थाटाची होती. आत सर्व सुबत्ता होती. संडास-बांथरूम होते. बेसिन होते. फ्रीज होता आणि एका बाजूला अगदी फ्रीजसारखाच दिसणारा शक्तिमान असा ट्रान्समीटर होता.



पलीकडच्या दारापलीकडे एक बेडरूम होती. कॉट आत होते. ड्रेसिंग टेबल होते. दोन कपाटे होती.

बिहारीलालने ट्रान्समीटरची एक खिट्टी फिरवली. तांबडा दिवा प्रकाशित झाला. टूंय टूंय असा आवाज ट्रान्समीटरमधून येऊ लागला. तो त्यावेळी दुसरी खिट्टी फिरवत होता. सारखे त्याचे लक्ष डाव्या मनगटावरील घड्याळावर स्थिर होत होते.

त्याने हेडगियर कानाला लावला आणि ट्रान्समीटरसमोरच्या फिरत्या लोखंडी स्टुलावर बसला. हलक्या आवाजात तो चमत्कारिक असे कोडशब्द उच्चारत होता.

'हॅलो, बंगल्यावर कोणाची तरी नजर आहे. काल दिवसभर माझ्यावर लक्ष ठेवण्यात येत होतं.' हलक्या आवाजात बिहारीलाल बोलत होता.

'सर, आपण त्या व्यक्तीला पाहिलंत?' पलीकडून विचारण्यात आले.

'नाही. माणूस सारखा बदलला जातो. तू त्याला पकडण्याची व्यवस्था कर.' बिहारीलालचा आवाज हुकमी होता.

'सर, कोणत्या पद्धतीनं?'

'मी आता कार घेऊन जम्मू रोडला जाणार आहे.'

'किती वाजता निघणार सर?'

'तू सांग... तुझी तयारी व्हायला किती वेळ लागेल?' बिहारीलालने कठोर आवाजात विचारले.

'पंधरा मिनिटे पुरे आहेत सर.'

'माझ्यापूर्वी तुझी माणसं त्या रस्त्यावर पोचायला हवीत.

'मी स्वतःच जाणार आहे सर.' पलीकडून आदबीने सांगण्यात आले.

'काही शंका?'

'नाही सर.'

'ओव्हर.' बिहारीलालच्या तोंडून शब्द बाहेर पडले आणि त्याचक्षणी त्याने डाव्या हाताने ट्रान्समीटरची खिट्टी कान पिरगाळल्यासारखी पिळली. तांबडा दिवा बंद झाला.

त्याने आतल्या बेडरूममध्ये जाऊन एक कपाट उघडले. आत कोऱ्या करकरीत नोटांची बंडले खच्चून भरलेली होती. त्यातील एक बंडल त्याने काढून खिशात घातले. दहा रुपयांच्या कोऱ्या नोटांचे होते ते.

दहा मिनिटांनी त्याने ते कपाटामागचे गुप्त दार बंद केले. कपाटही होते तसे स्थिर झाले. त्या आलिशान खोलीचे दार उघडण्यापूर्वी बिहारीलालने पुन्हा एकदा घड्याळात पाहिले. पंधरा मिनिटे पूर्ण व्हायला अद्याप तीन मिनिटे बाकी होती.

आपल्यावर पाळत ठेवणाऱ्या व्यक्तीला अटकाव करण्यासाठी जी माणसे प्रयत्न करतील, त्यांना आणखी थोडी सवड देणे भाग होते.

का कोण जाणे; पण काल दुपारपासून त्याची मनःस्थिती बिघडली होती. भीतीने त्याच्या मनात थैमान घातले होते. कधीकाळी आपला कुणाला संशय येईल, हे त्याने प्रसिद्धीच्या उन्मादात कधीही गृहीत धरले नव्हते. आणि हीच तर आपली चूक झाली नाही ना, असा विचार त्याच्या मनात डोकावला.

पंधरा मिनिटे पूर्ण झाली आणि त्याने ते आलिशान खास खोलीचे दार उघडले. दारात पूर्वीच अडकवलेली चावी खिशात टाकून तो निघाला. तेव्हा त्याच्या या कृतीचे कुणालाही आश्चर्य वाटले नाही.

कोट्यधीश बिहारीलाल अतिशय लहरी आहे, हे सर्वांना माहीत होते. त्याच्या कोणत्याही कृतीचे आश्चर्य वाटून घेण्याचे कुणालाही कारण नव्हते. तो कारजवळ येताच ड्रायव्हरने आदबीने मागच्या बाजूचे दार उघडले. नेहमीच्या रुबाबात तो आत बसला.

'जम्मूला घे.' बिहारीलालने मख्ख चेहऱ्याने हुकूम सोडला आणि ड्रायव्हर किंचित दचकल्यासारखा झाला. आश्चर्यचकित झालेल्या ड्रायव्हरने समोरच्या आरशातून मागच्या बाजूला बसलेल्या आपल्या मालकाचा चेहरा न्याहाळला.

जम्मूसारख्या ठिकाणी जाण्यासाठी मालक कधीही कॅडिला कार काढण्याचा हुकूम करीत नव्हता. कोणतीही पूर्वसूचना न देता इतक्या दूरचा प्रवासदेखील तो करत नव्हता. मालकाचे कडक नियम त्या ड्रायव्हरला परिचयाचे होते.

आणि आज एकाएकी आपल्या मालकाला जम्मूला जायचे आहे, हे ऐकून ड्रायव्हर गडबडला होता.

'काय झालं?' बिहारीलालने ड्रायव्हरला कठोर आवाजात विचारले. ड्रायव्हरचा उडालेला गोंधळ त्याच्या लक्षात आला होता.



'साहेब, ही कार घेऊन जायचं?'

'जम्मूला नाही जायचं... दहा-बारा मैलावरून परत यायचं. पेट्रोल किती आहे?' बिहारीलालने घाईघाईत विचारले.

'टाकी फूल भरलेली आहे साहेब.' ड्रायव्हरने आदबीने उत्तर दिले. बोलता बोलताच त्याने कार सुरू केली. संथपणे राजेशाही थाटाची कॅडिला कार भव्य अशा त्या बंगल्याच्या फाटकातून राजहंसारखी बाहेर पडली.

गाडी संथपणे शहरातील वेड्यावाकड्या रस्त्यांवरून श्रीनगर-जम्मू या मुख्य रस्त्यावर आली.

'ड्रायव्हर, मागून एखादी गाडी येते?' बिहारीलालने हलक्या आवाजात विचारले. आपण मागे पाहिले तर पाठलाग करणाऱ्यांना संशय येईल ही भीती त्याला वाटत होती.

'एक कार येत आहे साहेब... तांबड्या रंगाची.'

'आतली माणसे दिसतात?'

'चौघे जण असावेत साहेब. पुढे दोघे जण बसलेले आहेत.'

बोलणे इतक्यावरच थांबले. एखादी कार मागून आली, तर ती आपला पाठलाग करीत आहे, असा संशय घेण्याचे कारण त्या रस्त्यावर कोणतेही नव्हते. जम्मूकडे जाणाऱ्या त्या रस्त्याने अशा कित्येक गाड्या येत होत्या आणि जात होत्या, तरीही पाठलागाची भीती बिहारीलालला भेडसावत होती.

खरे म्हणजे, त्यावेळी पाठलाग झाला तर काळजी करण्याचे कोणतेही कारण त्याला नव्हते. पाठलाग झाला नसता तरच त्याला काळजी करावी लागणार होती.

ज्या ठिकाणी काहीतरी घडेल असा बिहारीलालने तर्क केला होता, त्याच काटकोनातील घातकी वळणाजवळ कार आली. जीवघेणे वळण आणि अरूंद रस्ता यामुळे आपोआपच त्यांना वेग कमी करावा लागला.

वळणावरच कडेला थांबलेल्या एका कारजवळून कॅडिलाकार पुढे निघून गेली. आपलीच माणसे बिहारीलालने अचूक ओळखली. वाटेत थांबलेली ती कार संथपणे कॅडिलाच्या मागून थोडीशी पुढे आली आणि भयंकर असे ते वळण संपताच रस्त्यावर वेडीवाकडी उभी राहिली.

आता कोणतीही कार त्या रस्त्यावरून पुढे जाणे शक्य नव्हते.

मागून आलेली तांबडी कार स्वतःवर ताबा ठेवू शकली नाही. कशीबशी करकर चाकांचा आवाज करीत रस्त्यात उभी असलेल्या कारला चुकवण्याचा प्रयत्न करीत एका दगडावर धडक दिली. आणि तशीच उजव्या बाजूला कलंडली. तिच्या मागच्या बाजूचे बंपर उभा असलेल्या कारला टेकल्यामुळे गिरकी खाता खाता ती वाचली होती.

तांबड्या कारच्या ड्रायव्हरने कमालीचे चातुर्य दाखवले होते. त्याने ती कार उजव्या बाजूने पुढे दामटली असती, तर हजारो फूट खोल दरीत कोसळली असती. केवळ दोन-चार जखमा होऊन जिवावरचे संकट टळले होते.

आणि म्हणूनच तर बिहारीलालचे साधले होते.

तांबड्या गाडीत बसलेले चौघे जण कसेबसे एका बाजूची दोन्ही दारे उघडून बाहेर पडण्याचा प्रयत्न करू लागले. उभा असलेल्या गाडीतील सहा जण त्यांच्याच स्वागतासाठी जय्यत तयारीत होते. बाहेर पडता पडताच आपले हातपाय कसे बांधले गेले, हे कुणालाही समजले नाही.

दोघांना उभा असलेल्या कारच्या मागच्या भागात पाय ठेवण्याच्या पोकळीत धान्यांच्या पोत्यासारखे ठेवण्यात आले आणि तिसऱ्याला डिकीत घातले गेले. चौथ्याला ड्रायव्हरच्या शेजारी शीटच्या पुढच्या भागात टाकले गेले.

चौघे जण त्या उभ्या कारमध्ये बसले. कशीबशी ती कार अरूंद रस्त्यावर वळवण्यात आली आणि तुफान वेगाने श्रीनगरच्या रोखाने धावू लागली.

उरलेल्या दोघांनी उलटलेली कार कॅडिलाचा ड्रायव्हर आणि बिहारीलालच्या मदतीने कशीबशी सरळ केली आणि खोल दरीत ढकलून दिली.

बिहारीलालच्या ड्रायव्हरला हा प्रकार नवीन होता. असे काही घडेल हे त्याच्या स्वप्नातदेखील आले नव्हते. घडलेल्या प्रकाराने त्याची वाचा बंद पडल्यासारखी होती.

चौघेही कॅडिलामध्ये बसले आणि बिहारीलालच्या हुकूमाबर हुकूम कार हळूहळू श्रीनगरच्या दिशेला वळवण्यात आली. जेव्हा ती श्रीनगरकडे धावू लागली, तेव्हा बिहारीलालने ड्रायव्हरची समजूत घालायला सुरवात केली. तांबड्या कारमधील ते चौघे पकडले गेले नसते, तर आपला मालक



आणि आपण ठार झालो असतो, या भावनेने जे घडले ते योग्य होते, या निर्णयाप्रत ड्रायव्हरचे मन जाऊन पोचले.

कॅडिला कार संथपणे बंगल्याच्या फाटकातून आत शिरली, तेव्हा पूर्वीसारखेच ड्रायव्हर आणि बिहारीलाल हे दोघेच कारमध्ये होते. बरोबरच्या दोघांनाही शहरात मध्येच उतरवण्यात आले होते.

चौघांनाही पकडल्यामुळे त्याची भीती कमी व्हायला हवी होती; पण उलट अधिकच वाढली होती. ते चौघेही कोण असावेत, याच विचारांचे थैमान त्याच्या डोक्यात सुरू झाले. आपण कोण, हे त्या लोकांनी तर ओळखले नसेल ना, ही भीती त्याच्या मनात सारखी वाढत राहिली.

तासभर तो बेचैन अवस्थेत होता. एक तास कित्येक तासासारखा रेंगाळत पुढे गेला. त्या तासात तो दर मिनिटा-मिनिटांगणिक घड्याळात पाहत होता.

अखेर त्याने आपल्या खास खोलीत प्रवेश केला. त्या खोलीत त्याच्याशिवाय कुणीही प्रवेश करू शकत नव्हता. बंगला विकत घेतल्यापासून आतापर्यंत कुणीही त्या खोलीत प्रवेश करू शकले नव्हते.

त्याने दाराचा आतून पक्का बंदोबस्त केला आणि नक्षीकाम असलेल्या कपाटाच्या चौकटीकडे जाऊन मोराच्या डोळ्यावर बोट ठेवले. डोळा तांबडा उजेड फेकीत लुकलुक करू लागला. कट् असा आवाज होऊन किंचित अशी घरघर सुरू झाली. पुन्हा कट् असा आवाज झाला आणि पूर्वीची घरघर थांबली. मोराच्या डोळ्यात लुकलुकणारा तांबडा दिवा बंद झाला.

कपाटाची मूठ खेचताच संपूर्ण कपाट दारासारखे ओढले गेले. अंधाऱ्या पोकळीत हात घालून बिहारीलालने आतल्या खोलीतील दिवा लावला.

झगझगीत उजेडात तो प्रथम ट्रान्समीटरजवळ आला. हेडगियर कानाला लावत त्याने ट्रान्समीटरची खिट्टी फिरवली. ट्रान्समीटरचा लाल दिवा पेटला. टूंय टूंय असा आवाज झाला. कोड शब्दांची देवाणघेवाण सुरू झाली.

बंगल्यातून बाहेर जाण्यापूर्वी ज्या व्यक्तीला त्याने सूचना केली होती, त्याच व्यक्तीशी तो आता बोलत होता.

'हॅलो, नझीर... ते कोण आहेत?' घाईघाईत बिहारीलालने विचारले. ट्रान्समीटरवरून कुणीही कुणाचे नाव घ्यायचे नाही, हा त्यानेच तयार केलेला संकेत भान न राहून स्वतःच मोडून टाकला.